कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थीनींना क्रीडा सहभागासाठी येणा—या अडचणींचा तुलनात्मक अभ्यास

पीएच.डी (शारीरिक शिक्षण) पदवीसाठी नांदेड विदयापीठास सादर केलेला संशोधनाचा आराखडा

संशोधिका

कांबळे रूपाली सिदू

मार्गदर्शिका

डॉ.वैशाली माडेकर

संशोधन केंद्र

शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग

नांदेड विदयापीठ

२०१४—२०१५

अनुक्रमणिका

अ.नं.	तपशील	पान.नं.
१	प्रस्तावना	१ – ६
२	संशोधन समस्येचे स्पस्ष्टीकरण	७
३	संशोधनाची गरज व महत्व	८ – ९
४	संदर्भ साहित्याचा आढावा	१0
५	संशोधनाची उदिदष्टये	११
६	गृहितके	१२
७	संशोधनाची व्याप्ती	१२
८	संशोधनाची मर्यादा	१२
९	स्वयंमर्यादा	१३
१0	कार्यात्मक व्याख्या	१३
११	संशोधनाची कार्यपदधती	१३
१२	जनसंख्या व न्यादर्श	१४
	१२.१ जनसंख्या	
	१२.२ न्यादर्श	
१३	नमुनानिवडपदधती	१४
१४	माहिती संकलनाची साधने	१४
१५	संख्याशास्त्रीय साधने	१४
१६	संदर्भसुची	१५

१.१ प्रस्तावना

संशोधनाची पार्श्वभूमी

भारतभूमीला माता मानून तिची पूजा करणा[1]या भारतीय संस्कृतीने पुरूष प्रधान समाजात स्त्रीला दुय्यम स्थान दिल आहे. स्त्रियांना पुरूषाप्रमाणे समान अधिकार नव्हते. चार भिंतीत सामावणारं तिचं विश्व असे. स्त्रीला तिचे मत व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता, तिला शिक्षणाचाही अधिकार नव्हता. मनोरंजन म्हणून झिम्मा फुगडी, सारखे खेळ त्यांना विशिष्ट सणांना जसे मंगळागौरी, गौरी, नागपंचमी इ. सणांना खेळण्याची प्रथा हेच काय ते त्यांचे मनोरंजन होते.

प्राचीन काळी वेगवेगळया पध्दतीने खेळ खेळले जायचे. त्यामुळे जीवनावश्यक बाबीबददल मानवाला या प्रकारच्या खेळामधून खूप काही शिकायला मिळायचे.यामधूनच त्यांचा व्यायाम व्हायचा आणि उदरनिर्वाहासाठीचे प्रशिक्षणही मिळावयाचे.उदा.भालाफेक, शिकारीसाठी त्या खेळाचा उपयोग व्हायचा.

पूर्वी शारीरिक व्यायाम करण्याची फारशी गरज पडत नसे, कारण व्यायामासाठी आणि इतर गरजा पूरवण्यासाठी लोकांना शारीरिक श्रम करावे लागे. वाहनांची सोय नसल्यामुळे एका ठिकाणावरून दुस[1]या ठिकाणी पायी जावे लागे, पुरूषाप्रमाणे स्त्रीयांनादेखील रोजच्या जीवनात कराव्या लागणा[1]या कामामध्ये — विहिरीतून पाणी काढणे, आणणे, जात्यावर दळण दळणे, कपडे धुणे, घर सारवणे अशा नानाविध प्रकारच्या घरगुती कामांमुळे शारीरिक श्रम व व्यायाम आपोआपच व्हायचा. दिवसेंदिवस समाजात अनेक बदल घडू लागले, तशा खेळाच्या संकल्पनेतही बदल होत गेले.विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये झालेल्या संशोधनामुळे अनेक उपकरणाचा शोध लागला, पारंपारिक उपकरणाची जागा अत्याधुनिक व विजेवर चालणा[1]या उपकरणांनी घेतला, जिथे शारीरिक श्रम वाचले गेले. जात्याची जागा पिठाच्या चक्कीने गिरणीने घेतली, पाटा-वरवंटा ऐवजी घराघरात मिक्सर आले. औदयोगिकीकरण व शहरीकरणामुळे मानवी जीवनाचा कायापालट झाला. पण या सर्वांचा दुष्परिणामही मानवी जीवनात झाला. तंत्राज्ञानाच्या प्रचंड प्रगतीमुळे मानवाची कष्ट करण्याची प्रवृत्ती कमी होऊन जास्तीत जास्त आरामदायक जीवन जगण्याकडे त्याचा कल वाढत आहे. स्पर्धेच्या युगामध्ये मानवाचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. सर्व कामे यंत्राव्दारे होत असल्याने शारीरिक स्वाथ्याबरोबर मानसिक स्वास्थही माणूस हरवून बसला आहे. शारीरिक हालचाली कमी झाल्यामुळे व्यायामाची प्रकर्षाने गरजभासू लागली, स्पर्धात्मक युगात आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी, वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी घडयाळाच्या काटयावर मानवी जीवन पळू लागले, त्यामुळे व्यायाम, कसरती करण्यासाठी वेळ

मिळेनासा झाला, आणि अनेक राहणीमानाशी संबंधीत विकार आजारांनी मानवी जीवनात प्रवेश केला. ह्दयविकार, मधुमेह, तणाव इ.आजारांचे प्रमाण वाढू लागले आहे. त्यामुळेच शारीरिक संतुलनाबरोबर मानसिक संतुलन राखण्यासाठी आणि या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी व्यायाम व खेळ ही अत्यंत प्रभावी साधनं आहेत.

पुरूषांच्या खांदयाला खांदा लावत त्यांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करणा[1]या स्त्रियांना घर व व्यवसाय नोकरी अशा दुहेरी भूमिका पार पाडाव्या लागतात आणि या जबाबदा[1]या सांभाळताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागते, स्त्रियांना त्यांच्या जबाबदा-या अधिक कार्यक्षमतेने पार पाडता येण्यासाठी त्यांना अगदी बालपणापासूनच खेळ आणि व्यायाम यांमध्ये सहभागी होणं गरजेचं आहे.

शारीरिक शिक्षण आणि खेळ

आज प्राथमिक.माध्यमिक शाळेमध्ये व महाविदयालयामध्ये शारीरिक शिक्षणाचा समावेश केलेला दिसून येत असला तरी हा विषय अनादी व अनंत आहे प्राचीन काळी शरीरावश्यक हालचाली शारीरिक शिक्षण म्हणून केल्या जात असत.जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी व करमणूकीसाठी शारीरिक हालचाली केल्या जातात. हेच त्या काळातील शारीरिक शिक्षणाचे ध्येय होते.त्याकाळी रानटी स्थितीत कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाच्या विशेष सोयी नसताना सुदधा शारीरिक शिक्षणाचे अस्तित्व होते.इतकेच नव्हे तर शारीरिक हालचालीमुळेच मानवास उदरभरण संरक्षण करता आले.शिकार करण्याकरिता रानावनातून धावणे व उडया मारणे पाण्यातून पोहून पलीकडे जाणे. नेम मारणे कुस्ती करणे. दगड व लाकडापासून शस्त्रे तयार करणे वगैरे अनेक नित्य व नैमित्तीक व्यवसायामुळे त्यावेळच्या मानवास योग्य ते शारीरिक श्रम होत असे व शरीर जास्त सदृढ व लायक झाले असले पाहीजे.

शारीरिक शिक्षण म्हणजे फक्त शरीराचे शिक्षण नसून शरीर, मन व बुदधी या तिन्हीचे शिक्षण आहे.बदलत्या जीवन पदधतीतील दुसरा परिणाम म्हणजे वाढते ताण तणाव बदलणारी सामाजिक परिस्थिती व त्यामुळे होणारे रोग उदा.मधुमेह.रक्तदाब.यासारख्या ताणतणावांना यशस्वीरित्या तोंड देणे यासाठी योग्य प्रशिक्षण देण्यासाठी शारीरिक शिक्षण हे अत्यंत नैसर्गीक.अनौपचारिक व प्रभावी माध्यम आहे. कोणत्याही व्यक्तीला जीवनातील कर्तव्य पूर्तीसाठी निकोप शरीरप्रकृती असणे ही प्राथमिक गरज आहे.

महिलांचा क्रीडा सहभाग

२० व्या शतकात पहिल्या महायुदधानंतर स्त्रियांना एक नवीन स्थान प्राप्त झाले. त्यामध्ये स्त्रिया पुरूषांबरोबर कार्य करू लागल्या आहेत.१९५२ च्या ऑलिम्पीक स्पर्धेपासून स्त्रियांना प्रतिस्पर्धात्मक खेळात संधी देण्यात आली. दुस1या महायुदधानंतर स्त्रियांना मोठया प्रमाणात खेळाची संधी मिळाली आहे. मुली प्राथमिक, माध्यमिक शाळेत असताना खेळतात, स्पर्धेमध्ये भाग घेतात परंतू जसे वय वाढेल कनिष्ठ, वरिष्ठ महाविदयालयात जातात तसे त्यांचे खेळणे कमी झालेले दिसून येते जाजू, पी.२००५´.परंतू त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने दररोज शारीरिक हालचाली करणे गरजेचे आहे.त्याचबरोबर खेळात सुदधा विविध नोक1या मिळवू शकतात या सर्वांचा विचार केला असता विदयार्थीनींचा आंतरमहाविदयालयीन क्रीडासहभाग वाढवणे आवश्यक आहे.

क्रीडा हे एक असे क्षेत्र आहे जिथे स्त्री व पुरूष असमानतेचे ठळक पुरावे आढळून येतात, आणि ही समस्या समाजीक व मानसिक अशा स्वरूपाची आहे. आज आपण एका नविन शतकात वाटचाल करत असताना देखील स्त्री व पुरूष यांना वेगवेगळी वागणूक दिली जाते विशेषतः क्रीडा क्षेत्रााात स्त्रीया जगाच्या लोकसंख्येचा ५०%भाग असूनही त्यांना समान संधी दिल्या जात नाहीत कोथेकर, एम., कनिटकर, जे.,२००५´.भारतामध्ये अजूनही क्रीदा खेळ त्यांच्या शिखरबिंदूपर्यंत पोहोचलेलं नाही.भारतावर मुघलांनी शतकोनशतके राज्य केलं, त्यांनंतर दीडशे वर्षे ब्रिटिशांनी.१९४७ सालानंतर आपण एका नविन आधुनिक राष्ट्रविकसित करण्यासाठी स्वातंत्रय मिळवलं.ज्यामध्ये भारतातील स्त्री नावाच्या निम्म्या भारतीयांना विशेष हक्क असतील पण अजूनही भारतीय स्त्रिया त्यांची स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

खूप वर्षापासून स्त्रीयांना खेळातून वगळण्यांचं समाजाचं एक कारण म्हणजे स्त्री व पुरूषांमध्ये नैसर्गि करित्या असलेलं वेगळपणं ब1याच लोकांच असं मत आहे, की स्त्रीया कधीच पुरूषांच्या कार्यमानाची बरोबर करू शकणार नाहीत किंवा त्यापुढे जाऊ शकाणार नाहीत, आणि खेळ म्हणजे रेकॉर्डस् बनवणं आणि इतरांवर प्रभूत्व करणं 3कार्यकामाच्या बाबतीत´मग शक्ती आणि कार्यमानाशी संबंधित खेळात स्त्रीया नेहमी दुस1याच स्थानावर राहतील 3कोथेकर, एम., कनिटकर, जे.,२००५´. अशा मानसिकतेच्या समाजात स्त्रीयांना खेळामध्ये सहभाग घेणं आणि उच्च कार्यमान बनवणं खूपच कठिण अशी गोष्ट होती, पण काही भारतीय स्त्रीयांनी उदा. पी.टी.उषा, मल्लेश्वरी, मेरी कॉम, सानिया नेहवाल, सानिया मिर्झा यांनी हे सिद्ध करून दाखवलं की स्त्रीया ही उच्च शिखर गाठू शकतात. समाजात अनेक प्रबोधन झाली, अनेक बदल होत

गेले असले तरीही आणि खेळाचे स्त्रीयांच्या आरोग्यातील फायदे माहिती असूनही अनेक कुटुंबातून मुलींना क्रीडा सहभागास विरोध होतोच. मुलींचा क्रीडा सहभाग अजूनही वाढलेला आढळून येत नाही. संशोधनाने असे आढळून आले की वयाच्या १४ वर्षापासून मुलींचा खेळातील सहभाग घसरतो. खेळ सोडून देण्याचे मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा सहापटीने जास्त आहे ३व्हुमन्स स्पोर्टस फाऊंडेशनहं. महाविदयालयीन मुलींचा क्रीडा सहभाग फारसा दिसून येत नाही. खेडयापाडयात अजुनही मुलींची मानसिकता, कुटुंबाची मानसिकता यामध्ये बदल झालेला नाही.

पहिली शरीर संपत्ती, दुसरी पुत्रसंपत्ती, आणि तिसरी धनसंपत्ती असेल तोच पुण्यवान ही राजर्षी च्या मनातील विचार सुमनमाला आजही कोल्हापूरच्या मोतीबाग तालमीच्या दर्शनी दरवाजावर झळकलेली दिसते.राजर्षी शाहू महाराज बलोपासक होते.धिप्पाड आणि सामर्थ्यवान राजाने " शरीर मादयं खलु धर्म साधनम" बलसंवर्धनाचा मल्लविदयेच्या माध्यमाने लोकांच्या पर्यत पोहचविला.राजर्षीच्या राजदंड शिक्षण नेत्रांनी सर्वत्र नजर फेकून आखिल मानव जातीच्या शरीर आणि मन यांच्या विकासासाठी जागता पहारा देत असे म्हणून फार प्राचीन काळापासून कोल्हापूरला दक्षिण कांशी म्हणून संबोधले जात होते त्यामध्ये कोल्हापूर हे मल्ल विदयेचे विदयापीठ आहे. कोल्हापूर जिल्हा म्हटला की, पैलवान हाच शब्द सर्वांच्या तोंडात असतो. ऑलंम्पीक स्पर्धेत कुस्तीमध्ये ब्रॉन्झ पदक मिळवून जगातील क्रीडा इतिहासात भारताचे व कोल्हापूरचे नाव चमकविणा—या खाशाबा जाधव या कुस्तीवीराप्रमाणे कोल्हापूरच्या क्रीडा संस्कृतीचा वारसा पुढे चालवत तेजस्विनी सावंत व राही पटवर्धन या कोल्हापूरच्या कन्यांनी कोल्हापूरचे नाव देशभरात व विदेशातही गाजविले. अशा या कोल्हापूरमध्ये मुलींचा विविध खेळामध्ये सहभाग कसा आहे व मुलींच्या कमी झालेल्या क्रीडा सहभागामागे काही इतर कारणे जशा भौतिक व आर्थिक सुविधांचा अभाव, प्रेरणेचा अभाव इ. आहे.हे जाणून घेणे महत्वाचे आहे. सांगलीची क्रीडा परंपरा ही पण अभिमानास्पद आहे.विजय हजारे, नंदू नाटेकर, हरिनाना पवार तसेच नामवंत क्रीडापटूंमध्ये व्यंकाप्पा बुरूड ज्योतिरामदादा सावर्डेकर, मारूती माने ,गणपतराव आळंदकर अशा सांगलीशी संबंधित मल्लांचा उल्लेख करावा लागेल.या पैलवान मंडळींनी सांगलीचा नावलौकिक कुस्तीक्षेत्रात वाढवला.सांगलीच्या तरूण तरूणींना ,बालवयापासून क्रीडाक्षेत्रातील अत्याधुनिक सुविधा लाभल्या पाहीजेत, उत्कृष्ठ मैदान मिळालं पाहीजे, यासाठी क्रीडासंघटक अण्णासाहेब गोटखिंडे यांनी फार परिश्रम घेतले.तरूणभारत, आझाद व्यायाम मंडळ, विजयंता व्यायाम मंडळ, समर्थ व्यायाम मंडळ ,अशा अनेक संस्थांच्या प्रयत्नांमुळे क्रीडाक्षेत्रात सांगली अग्रेसर राहीली आहे.बुध्दिबळ प्रशिक्षक भाऊसाहेब पडसलगीकर हे सांगलीचेच.या सर्वांच्यामुळे महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती'पुरस्कार अनेक सांगलीकरांनी मिळविलेला आहे.मारूती माने ३कुस्तीं ,अनिल पाटील ३वेटलिफ्टिंगं ,श्रीराम भावसार

(कबडडी´ .सुजाता नवले कल्याणी .माधवी केरीपाळे व्हॉलीबॉल´ सरीता पाटील) ॲथलेटिक्स´ स्वाती करंदीकर [3]कबडडी´ असे अनेक सांगलीच्या खेळाडूंनी वेगवेगळया खेळप्रकारामध्ये प्राविण्य मिळविलेले आहे. यावरून असे लक्षात येते की सांगलीला पूर्वीपासूनच खेळाची परंपरा लाभलेली आहे.

सांगली आणि कोल्हापूर जिल्हयाचा कीडा विषयी विचार केला असता दोन्ही जिल्हयाला खेळाची परंपरा ही पूर्वीपासूनच लाभलेली आहे आणि आजपर्यंत ती टिकून राहीलेली दिसून येते.

आणि हे जाणून घेतल्याशिवाय त्यावर उपाययोजना करता येतील. व त्यांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करण्यासाठी महाविदयालयीन विदयार्थिनींच्या कीडा सहभागामध्ये येणा-या अडचणींचा अभ्यास करण्याचे ठरवले आहे.

१.२ संशोधन समस्येचे स्पष्टीकरण

भारतीय संस्कृतीने अगदी पुरातन काळापासून स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान दिले आहे. शरीर सदृढ ठेवणे अंगपिंडाने भरदार असणे हे पुरूषसौंदर्याचे लक्षण मानलेले असून स्त्रियांनी व्यायाम कणखर न शरीर कमावणे हे पुरातन काळापासून वर्ज्य मानले आहे. दिवसेंदिवस या संकल्पनेत बदल होत आहे मात्र तरीही पुरूषांइतकेच स्त्रियांच्या कीडासहभागाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन समाजाचा नाही ह्यवुमन्स स्पोर्ट स फाऊंडेशन, २००७´. या कारणास्तव मोजक्याच स्त्रिया आज कीडाक्षेत्रात करीअर करतांना आपणास आढळते. यातही संबधीत स्त्रीयांना प्रतिकुलेचा सामना करावा लागतो. यांमुळेच आपल्या भारतातील एकूण लोकसंख्येच्या ५०% लोकांना म्हणजेच स्त्रीयांना कीडास्पर्धा व कीडासहभागापासून वंचित रहावे लागते. आज भारत देश लोकसंख्येच्या बाबतीत अब्जाधीश असूनही आंतरराष्ट्रीय कीडा स्पर्धात उदा. ऑलंम्पीक मध्ये आपणांस मोजकेच पदक प्राप्त होतात ही लांच्छनास्पद बाब आहे. या सर्व गोष्टींना सामाजिक परीस्थिती देखील जबाबदार आहे. विदयार्थीनींच्या सहभागाची समस्या अगदी शालेय स्पर्धेपासून प्रकर्षाने जाणवते.

प्रत्येक देश सर्व क्षेत्रामध्ये स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्याबरोबर स्त्रियासुदधा प्रत्येक क्षेत्रामध्ये पुढे गेलेल्या दिसून येत आहेत. त्यापैकी एक महत्वाचे क्षेत्र म्हणजे कीडा. कीडा क्षेत्रामध्ये सुदधा आज महिला उच्च दर्जाचे करियर करत आहेत. त्याचबरोबर राष्ट्रीय. आंतरराष्ट्रीय पातळीवर महिला कीडाक्षेत्रात उच्च दर्जाचे कार्यमान करत आहेत.

विदयार्थ्याची चारित्र संपन्नता वाढविण्यासाठी त्याच्या भावना विकासाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. मैदानावर खेळतांना शारीरिक, बौदधीक, सामाजिक विकास होण्यास मदत होते. विदयार्थ्याचा विचार व तर्कशक्तीचा विकास होण्यास मदत होते. विदयार्थ्याचा विचार व तर्कशक्तीचा विकास करणे हे शिक्षणाचे

व शारीरिक शिशणाचे महत्वाचे उदिदष्ट आहे.स्पर्धेमध्ये खेळताना हारणे आणि जिंकणे हया दोन गोष्टी बरोबरच सहभाग सुदधा तितकाच महत्वाचा आहे.हारल्यामुळे दुखःची भावना निर्माण होते.तर जिंकल्यानंतर आनंदाची भावना निर्माण होते.यांमुळे भावनांचा विकास होण्यास मदत होते. मुलांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक क्षमतांचा खेळात वेळ वाया जातो म्हणून बौदिधक प्रगती होत नाही ही समजूत चुकीची आहे.खेळामध्ये अनेक ज्ञानेंद्रिये कार्यरत असतात.त्यांच्या परस्परपुरक कृतिमुळे शारीरिक हालचाली बरोबर मानसिक दृष्टया उपयुक्त घटकांचा विकास होतो.खेळ ही एक नैसर्गिक वृत्ती आहे.मुल स्वतंत्र असता त्यांच्या मनाच्या कल्पनामुळे त्यांचे अवधान अधिक टिकून राहते [3]आलेगांवकर,२०००´ .

राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार करण्यासाठी प्रथम आंतरमहाविदयालयीन कीडा स्पर्धामध्ये विदयार्थीनींचा सहभाग खूप महत्वाचा आहे आणि यांतून देशाला चांगले खेळाडू मिळतील.चांगली गुणवत्ता असणा[1]या खेळाडूंना त्यांच्या आयुष्यात चांगली कामगिरी करून दाखवण्याची संधी मिळते.त्याचबरोबर महिलांचे आरोग्य चांगले असेल तर पुढील पिढी सुदधा सदृढ तयार होइल. म्हणून कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महादयालयिन विदयार्थीनींचा सहभाग घेताना येणा—या अडचणींचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी सदर संशोधिकीने हा विषय निवडला आहे.

१.३ संशोधनाची गरज व महत्व

१.३.१ संशोधनाची गरज

महाविदयालयीन स्तरावर कीडा क्षेत्रामध्ये विदयार्थीनींचा सहभाग हा एक चिंतेचा विषय होत चाललेला दिसून येत आहे. विदयार्थ्यांप्रमाणे आंतरमहाविदयालयीन, आंतरविभागीय, आंतरविदयापीठ स्पर्धेमध्ये विदयार्थी नींचा सहभाग तेवढाच मोलाचा आहे. जिल्हा आंतरमहाविदयालयीन स्पर्धा म्हणजेच राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहचण्याची पहिली पायरी आहे. विदयार्थीनीचा आंतरमहाविदयालयीन स्पर्धेमध्ये मोठया प्रमाणात सहभाग असेल तरच राज्यस्तरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशाला चांगले खेळाडू लाभतील. मुलींना व महिलांना समक्ष वनविण्याच्या दृष्टीने व त्यांना कीडा क्षेत्रातील करीयरची सुवर्णसंधी दाखवून देण्यासाठी त्यांचा शालेय व महाविदयालयीन जीवनातील कीडा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. आणि यासाठी प्रथम त्यांच्या कमी होत असलेल्या कीडा सहभागामागची कारणे व त्यांना त्यासाठी येणारे अडथळे कोणते आहेत हे शोधणे गरजेचे आहे. यासाठी संशोधिकेने सदर विषय संशोधनासाठी निवडला आहे.

१.३.२संशोधनाचे महत्व

गिर्यारोहक बचेंद्री पाल म्हणतात.माझ्या मते भारतात आपण मुलींकडे दुर्लक्ष करतो व त्यांना घराबाहेरच्या उपक्रमामध्ये भाग घेण्यास परावृत्त करतो.साहसाबददल प्रेम व धोक्याचे आव्हान स्वीकार न जगायला शिकणे हया गोष्टी मुलांइतक्याच मुलींनाही आवश्यक आहेत.कारण त्यामुळे साहस.धीटपणा व पुढाकार घेण्याची वृत्ती या गुणांचा विकास होतो. सद्याच्या स्पर्धेच्या युगात घर आणि नोकरी या जबाबदा[1]या साभांळत असताना स्वतःचे शारीरिक आणि मानसिक संतुलन राखण्यासाठी महिलांना खेळ व व्यायाम या महत्वाच्या गोष्टी आहेत. आणि त्या या गोष्टी त्यांच्या शालेय व महाविद्यालयीन क्रीडा सहभागातून सहजपणे आत्मसात करू शकतात. मात्र महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा क्रीडा सहभाग अत्यंत कमी आढळून आला आहे. यामागच्या कारणांचा म्हणजेच विद्यार्थिनींच्या क्रीडा सहभागामध्ये येणा[1]या अडचणींचा व समस्यांचा अभ्यास केला तर त्या समस्या सोडविणे व त्यावर योग्य ती उपाययोजना करणे सोपे जाईल. आणि त्यांचा क्रीडा सहभाग वाढवून मुलींना व महिलांना शारीरिक व मानसिकदृष्टया सबल करणे व आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात सहभाग व यश वाढवण्यात मदत होईल.

१.४ संदर्भ साहित्याचा आढावा

फिलीपस जीए.आणि यंग डीआर [3]२००९´ यांनी खेळातील सहभाग आणि सध्याची शारीरिक हालचाली आणि शारीरिक सदृढता यांवर संशोधन केले आहे.यासाठी संशोधकाने खेळातील सहभाग पाहण्यासाठी प्रश्नावलीचा वापर केला आहे.यांवरून असे निष्कर्ष मिळाले आहेत की.ज्यांचा शारीरिक हालचालीतील सहभाग कमी आहे त्यांच्यामध्ये प्रमाणापेक्षा जास्त वजन दिसून आले आहे.ज्या मुलींचा आगोदर सहभाग होता त्यांना ॲरोबिक स्टेप टेस्ट व्यवस्थित देण्यात आली.शहरातील मुलींचा क्रीडा सहभाग वाढल्याने त्यांची शारीरिक सदृढता वाढल्याची दिसून आले आहे.

केसटनर. यांनी मुलींच्या क्रीडा सहभागाचा अभ्यास केला आहे.१९७२ ते १९७८ पर्यंत ६०० मुलींचा सहभाग वाढलेला दिसून आला आहे.त्यानंतर त्यांनी २० ते २५ वर्षे अभ्यास केला त्यामध्ये असे दिसून आले आहे की.त्यावेळेस ज्यांनी सहभाग घेतला होता त्यांच्या शरीराचे वजन कमी तसेच मेदाचे प्रमाण सुदधा कमी असलेलेदिसून आलेले आहे.याचे कारण त्यांनी त्यावेळेस खेळामध्ये सहभाग घेतला होता.

मीचीगन उच्च माध्यमिक ॲथलेटिक असोसिएशन २००९´ यांनी एक २००८ –२००९ मध्ये सर्वेक्षण केले आहे.शाळेमध्ये आंतरकुल स्पर्धा सुरू करून मुलींचा क्रीडा सहभाग वाढतो का हे पाहीले आहे.२००८–

२००९ मध्ये राज्यस्तरावरील सहभाग तीन लाख होता. तोच सहभाग २००९—२०१० मध्ये ०.९ नी कमी झालेला दिसून आला आहे. त्यांनी पोहण्याच्या स्पर्धेतील सहभाग पाहीला असता मुलींचा सहभाग १७ कमी दिसून आला आहे. कारण नवीन खेळाकडे मुली आकर्षीत झालेल्या दिसून आल्या आहेत.

जेफरी थॉमस २००७´ यांच्या मते यूएसए मध्ये १९७२ मध्ये मुलींचा सहभाग खूप कमी होता. परंतू मुलांच्या पेक्षा कमी होता कारण त्यांना मिळणा—या सुविधा मुलांच्या पेक्षा मुलींना कमी दिल्या गेल्या होत्या. नॅशनल कॉलेज ॲथलिट असोसिएशन ने १९७१ ते २००५ पर्यंत मुलांपेक्षा मुलींचा सहभाग ५४% वाढलेला दिसून आला आहे.

२००२ मध्ये एका संशोधनात ॲथलेटिक्स मध्ये जे विदयार्थी सहभाग घेतात त्यांची शारीरिक सदृढता इतर खेळाडूंच्या पेक्षा चांगली असते असे दिसून आले आहे. ज्यांची शारीरिक सदृढता चांगली आहे त्यांची शैक्षणिक संपादन सुदधा चांगले असल्याचे दिसून आले आहे. कीडा सहभागामुळे त्यांचा वाढलेला दिसून आलेला आहे.

१.५ संशोधनाची उद्दिष्टये

कोल्हापूरव सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थीनींच्या अडचणी जाणून घेण्यासाठी शिक्षक निर्मित प्रश्नावली तयार करणे.

१. कोल्हापूरव सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थीनींच्या कीडा सहभागाची प्रश्नावलीच्या साहाय्याने माहिती घेणे.
२. प्रश्नावलीव्दारे विदयार्थिनींच्या कीडासहभागात येणा—या अडचणींची माहिती मिळवणे.
३. विदयार्थीनींच्या कीडा सहभागाच्या माहितीचे विश्लेषण करणे.
४. कोल्हापूर व सागलीं जिल्हयातील विदयार्थीनीच्या कीडासहभागातील अडचणींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

१.६ गृहितके

- शारीरिक शिक्षण संचालक विदयार्थीनींच्या कीडा सहभागाविषयी सत्य माहिती देतील.
- विदयार्थीनीं सदसदविवेक बुध्दीने प्रतिसाद देतील.
- प्रश्नावलीव्दारे मिळालेली माहिती सत्य व विश्वसनीय असेल.

१.७ संशोधनाची व्याप्ती

- सदर संशोधनासाठी कोल्हापूर व सांगली जिल्हयातील कला, वाणिज्य,.शास्त्र शाखा असणारे वरिष्ठ महाविदयालये असतील.
- सदर संशोधनात कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयातील खेळाडू असणा[1]या सर्व विदयार्थीनी असतील.
- सदर संशोधनासाठी कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयातील सर्व शारीरिक शिक्षण संचालकांची मदत घेण्यात येईल.

१.८ संशोधनाची मर्यादा

- सदर संशोधनाचे निष्कर्ष केवळ विद्यार्थिनींनी भरून दिलेल्या प्रश्नावलीवर आधारित असतील.
- सदर संशोधन हे कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थीनींच्या पुरतेच मर्यादीत असेल.
- सदर संशोधन फक्त कोल्हापूर व सांगली या दोन जिल्हयापुरतेच मर्यादीत असेल.

१.९स्वयंमर्यादा

- सदर संशोधन कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थीनींपुरतेच मर्यादित असेल.
- सदर संशोधन कोल्हापूर व सांगली जिल्हयातील कला.वाणिज्य.शास्त्र शाखा असणा—या महाविदयालयांपुरतेच मर्यादीत असेल.

१.१० कार्यात्मक व्याख्या

- **वरिष्ठ महाविदयालय**

  बी.ए.बी.कॉम बी.एस्सी अशी पदव्युत्तर शिक्षण देणारे कोल्हापुर व सांगली जिल्हयातील महाविदयालय म्हणजे वरिष्ठ महाविद्यालय होय.

● क्रीडा सहभाग

तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, विदयापीठ, आंतरविदयापीठ स्तरावर कोणत्याही खेळप्रकारामध्ये खेळणे म्हणजे क्रीडा सहभाग होय.

● क्रीडा सहभागातील अडचणी

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होताना येणा[1]या वैयक्तीक, सामाजीक, आर्थिक मानसिक, शारीरिक, तांत्रिक सोयी सुविधा इ. येणा[1]या समस्या म्हणजेच क्रीडा सहभागातील अडचणी होय.

१.११ संशोधनाची कार्यपध्दती

सदर संशोधिका कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थीनींचा क्रीडा सहभागासाठी येणा—या अडचणींचा तुलनात्मक अभ्यास करणार आहे. संशोधिका सदर संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पदधतीचा वापर करणार आहे. सर्वेक्षण पदधतीमध्ये कमी वेळेत जास्त प्रमाणात माहिती मिळवता येते. म्हणून ही पदधत माझ्या संशोधनाला अनुरूप आहे.

१.१२ जनसंख्या व न्यादर्श

१.१२.१ जनसंख्या

कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वरिष्ठ महाविदयालयामधील सर्व खेळाडू विदयार्थीनी ही जनसंख्या आहे.

१.१२.२ न्यादर्श

संशोधिकेने एम.फिल या पदवीसाठी कोल्हापूर जिल्हयातील कला, वाणिज्य व शास्त्र अशा तीन शाखा एकत्र असणा—या १८महाविदयालयातील २४० खेळाडू विदयार्थीनींना क्रीडा सहभागासाठी येणा—या अडचणींचा अभ्यास केलेला आहे. सदर संशोधनासाठी सांगली जिल्हयातील कला, वाणिज्य व शास्त्र शाखा असणा—या १५ वरिष्ठ महाविदयालया मधून २४० खेळाडू विदयार्थीनींना क्रीडा सहभागासाठी येणा—या अडचणींचा अभ्यास करण्यात येणार आहे. एकूण ४८० विदयार्थीनींचा अभ्यास करून कोल्हापूर व सांगली जिल्हयाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल.

१.१३ नमुना निवड पदधती

सदर संशोधनासाठी कोल्हापूर जिल्हयातील यादृच्छिक पदधतीने निवड करून २४० विदयार्थीनींचा अभ्यास केलेला आहे. व सांगली जिल्हयातील १५ वरिष्ठ महाविदयालयातून यादृच्छीक पदधतीने प्रत्येक महाविदयालया मधून १५ अशी २२५ विदयार्थिनींची निवड करण्यात येईल.

१.१४ माहिती संकलनाची साधने

सदर संशोधनाच्या माहिती संकलनासाठी शिक्षक निर्मित प्रश्नावलीचा वापर करण्यात येईल.

१.१५ संख्याशास्त्रीय साधने

सदर संशोधनासाठी मिळालेल्या माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी काय स्क्वेयर आणि टी टेस्ट या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करण्यात येईल.

संदर्भसुची

आलेगांवकर, प.म.२000´प्रगत कीडामानसशास्त्र.कॉन्टिनेन्टल प्रकाशन. पुणे.

कोथेकर, एम., कनिटकर, जे., दनी, टी., व जाजू, पी.२00५´. अ स्टडी ऑन जेन्डर इश्यूज इन स्पोर्टस इन इंडिया.अ प्रोजेक्ट. नॅशनल कमीशन फॉर वुमेन. नवी दिल्ली.

पाल बचेंद्री १९९६´.एव्हरेस्ट माझ्या जीवनातील अत्युच्च शिखर. अनुवाद सुजला नित्सुरे. नॅशनल बुक ट्रस्ट. इंडिया

भारतीय स्त्री शक्ती.२00५´.स्टडी ऑन जेंडर इश्युज इन स्पोर्ट इन इंडिया -प्रोजेक्ट. नॅशनल कमीशन फॉर वुमेन. नवी दिल्ली.

भिंताडे वि.रा.२00४´शैक्षणिक संशोधन पदधती, नुतन प्रकाशन. पुणे.

मुळे, रा.श आणि उमाठे, वि.तु.१९९९´. *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे*: औरंगाबाद. विदया बुक्स.

वुमन्स स्पोर्टस फाऊंडेशन, २00७´.हुज प्लेईंग कॉलेज स्पोर्टस ट्रेण्डस इन पार्टिसिपेशन.संकेतस्थळ http://womencolle ges.org/sto ry/t itl e _ ix resea rch

अविनाश टिळक २00१´ सांगली आणि सांगलीकर. नगरवाचनालय. राजवाडा चौक सांगली.